महापालिका सहाय्यक आयुक्त
बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका
उत्सव इमारत,शिवनेरी पथ,बिबवेवाडी,पुणे-३७
Email - asakpal@punecorporation.org
दुरध्वनी क्र. - 020-25508700
जा.क्र. ८४६ दि.- ३१/५/२०१८

# अपिलाची सुनावणी

अपिलीय अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांच्या प्राधिकरणासमोरील कामकाज.

दिनांक - ३०/०५/२०१८

दिनांक - सकाळी ११.३० वा.

स्थळ - महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका, उत्सव इमारत, शिवनेरी पथ, बिबवेवाडी, पुणे ४११ ०३७.

प्रति,

**श्री. बाजीराव विश्वनाथ कांबळे**
स.नं.६५, तळजाई वसाहत,
सहाकारनगर, पदमावती, पुणे ४११००९.
} **अपिलार्थी**

**श्री.मु.म.शेख**
महापालिका सहाय्यक आयुक्त
बिबवेवाडी कार्यालय,
पुणे महानगरपालिका.
} **जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता**

## माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये अपिल

श्री. बाजीराव विश्वनाथ कांबळे (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांचा माहिती अधिकारातील दिनांक २५/०१/२०१८ रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका (यापुढे जन माहिती अधिकारी म्हणून संबोधिले जातील) यांना दिनांक २३/०२/२०१८ रोजी प्राप्त झाला. सदर अर्जाव्दारे अपिलार्थी यांनी सन २००० ते २०१८ आज अखेर पर्यंत सेवा केंद्र व स्मार्ट सेवा सहकारी संस्था यांना मनपाकडून विना निविदा देण्यात आलेली कामे इतर धनादेश बाबतची माहिती विचारलेली होती.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जाचा दिनांक | अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | माहिती द्यावयाचा अंतिम दिनांक | अर्जदारास माहिती पाठविल्याचा दिनांक | विलंब दिवस |
| २५/०१/२०१८ | २३/०२/२०१८ | २५/०२/२०१८ | - | - |

अपिलार्थी यांनी विचारलेली माहिती न मिळाल्याने त्यांचा अपिल अर्ज दिनांक ०५/०५/२०१८ रोजी अपिल अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांचेकडे प्राप्त झाला.

| अपिल अर्जाचा तपशील | | |
|---|---|---|
| अपिल अर्जाचा दिनांक | अपिल अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | अपिल दाखल करावयाचा अंतिम दिनांक |
| ०५/०५/२०१८ | ०५/०५/२०१८ | अपिल अर्ज मुदतीत आहे. |

प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ - दि.३०/०५/२०१८ रोजी सकाळी ११.३० वा.
सुनावणीस अपिलकर्ता - उपस्थित
सुनावणीस जनमाहिती अधिकारी - उपस्थित
सुनावणी सहा. जनमाहिती अधिकारी - उपस्थित

**जनमाहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस दिलेल्या उत्तराचा/माहितीचा तपशील -**

| क्र. | माहितीचे वर्णन | तपशील |
|---|---|---|
| मुद्दा क्र.१ | समाज विकास विभागा कडील सेवा केंद्रांना व स्मार्ट सेवा सहकारी संस्थेला सहाय्यक आयुक्त कार्यालयांकडून देण्यात आलेल्या कामाची वर्क ऑर्डर प्रत तसेच याचा मोबदला कोणाच्या नावाने देण्यात आला आहे याची संबंधित कागदपत्रांसह माहिती मिळावी. | माहिती देणेत आलेली नाही. |
| मुद्दा क्र.२ | समाज विकास विभागाकडील सेवा केंद्रांना व स्मार्ट सेवा सहकारी | माहिती देणेत आलेली नाही. |

| | | |
|---|---|---|
| | संस्थेला पुणे महानगरपालिके कडून संस्था पदाधिकारी यांना मानधन तसेच इतर आर्थीक मदतीचे कोणाच्या नावाने धनादेश देण्यात आले आहेत याची संबंधित कागदपत्रांसह माहिती मिळावी. | |
| मुद्दा क्र.३ | स्मार्ट सेवा सहकारी संस्थेला या एकाच संस्थेला किती वर्षापासून विना निविदा कामे व आर्थिक मदत महानगरपालिका करत आहे याची माहिती मिळावी. | माहिती देणेत आलेली नाही. |

अपिलार्थी यांचे वरील अपिल अर्जावर दिनांक ३०/०५/२०१८ रोजी सकाळी ११.३० वाजता सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीस अपिलार्थी श्री.बाजीराव विश्वनाथ कांबळे हे उपस्थित होते. सदर दिनांकास श्री.मु.म.शेख जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका हे उपस्थित होते. तसेच सहाय्यक जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता श्री. शशिकांत निवदेकर व श्री. नरेंद्र परदेशी हे उपस्थित होते.

अपिलार्थी श्री. बाजीराव विश्वनाथ कांबळे यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वयेच्या त्यांच्या अर्जाची माहिती न मिळाल्याने त्यांनी प्रथम अपिल अर्ज दाखल केलेला आहे.

वरीलप्रमाणे संबंधित जनमाहिती अधिकारी व सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतले त्यानुसार मी, अपिलीय अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांनी प्रस्तुत प्रकरणी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे

**<u>अपिल अधिकारी यांनी सदर सुनावणीमध्ये केलेले 'आदेश'</u>**

➢ जनमाहिती अधिकारी व सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अधिकार अर्जात नमूद केलेल्या मुद्दा क्र. १, २ व ३ इत्यादीबाबतची महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालयाकडील सद्यस्थितीत उपलब्ध असणारी माहिती अपिलार्थी श्री.बाजीराव विश्वनाथ कांबळे यांना त्वरीत विनामुल्य उपलब्ध करून देणेत यावी. तसेच, अपिलार्थींच्या मागणीनुसार त्यांना आवश्यक असणाऱ्या माहितीकरिता कार्यालयातील दप्तराची पुन:श्च तपासणी करून तपासणीनंतर कार्यालयात उपलब्ध होणारी माहिती पुढिल १५ दिवसात अपिलार्थी यांच्याशी संपर्क साधून अपिलार्थीस विनामुल्य उपलब्ध करून देण्यात यावी. तसेच यापुढे माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत प्राप्त अर्जांची माहिती जनमाहिती अधिकारी व सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांनी अर्जदारास विहित मुदतीत उपलब्ध करून देणेची दक्षता घ्यावी.

कळावे,

30.05.18

(अविनाश सकपाळ)
**अपिलीय अधिकारी** तथा
**महापालिका सहाय्यक आयुक्त**
बिबवेवाडी कार्यालय
पुणे महानगरपालिका.

<u>टिप –</u>

१. सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या आत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे – ४११००१ यांचेकड व्दितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतूद आहे.
२. प्रथम अपील सुनावणी आदेशाची प्रत www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रत –

१. श्री.बाजीराव विश्वनाथ कांबळे, स.नं.६५, तळजाई वसाहत, सहारनगर, पदमावती, पुणे ४११००९.
२. श्री.मु.म.शेख जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका.
३. सर्व कनिष्ठ अभियंता तथा सहा.जनमाहिती अधिकारी, महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका.